# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०६/०५/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### केबल चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील खदान नंबर ४ कन्हान पारशिवनी येथे दिनांक ०५/०५/२०२२ चे ०१.०० वा. ते ०१.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविकांत रामदास कंडे(डब्ल्यु.सी.एल. सेक्युरिटी इंचार्ज) वय ५५ वर्ष रा. चनकापुर कॉलोनी २६/१ खापरखेडा कन्हान नागपूर ग्रामीण हे स्टाफ सह डब्ल्यु.सी.एल. परीसरात पेट्रोलींग डयुटी करीत असतांना आरोपी नामे– १) किसन कासीराम धुर्वे, वय १९ वर्ष २) राकेश जिवन मरकाम, वय २२ वर्ष ३) कन्हैया काशीराम धुर्वे वय १९ वर्ष व वय १४ वर्षीय विधीसंघर्षीत बालक सर्व रा. खदान नंबर ४, ब्लॅक डायमंड स्टेडीयम यांनी संगणमत करून ७० उ ड पी वी सी आर्मर केबल ६० फुट कि. ९०,०००/–रू. चा मुद्देमाल खदान नंबर ४ येथून कापुन चोरी करून घेवून जातांना दिसून आले. यातील आरोपी हे अंधाराचा फायदा घेवून पळून जात असतांना फिर्यादीने स्टाफ सह पाठलाग करून पकडले असता यातील आरोपी क्र १ व वय १४ वर्षीय विधीसंघर्षीत बालक हे मिळून आल्याने तसेच आरोपी क्र २, ३ हे अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. तसेच आरोपी क. १ याच्या जवळून ७० ड डपी वी सी आर्मर केबल ६० फुट कि. ९०,००० /–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. तपासा दरम्यान सर्व आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मोहन शेडके मो.नं. ९९२३६२१२७५ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील दहेगाव रोड चनकापुर येथे दिनांक ०४/०५/२०२२ चे २३.०० वा. ते दिनांक ०५/०५/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– वीनय लक्ष्मणराव महाजन, वय ५८ वर्ष, रा. वार्ड नं. ३ खापरखेडा यांचे चनकापुर येथे पेट्रोलपंप असुन त्यांच्या शेजारी स्वताचे सांस्कृतीक भवन आहे. त्यामध्ये आईल ठेवण्याचे गोडावुन आहे. त्या गोडावुन मध्ये १२ आईलच्या पेटया ठेवले होते. घटना ता. वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपीने गोडावुन मधुन ठेवलेल्या आईलच्या पेटया मधुन १) सर्वा कंपनीचे ५ लीटरचे ४ डबक्या असलेले १ बॉक्स असे ४ बाक्स प्रत्येकी किमती १,०५०/–रू. असा एकुण ४,२००/–रू., २) १ लीटरचे प्रत्येकी २० डब्बे असलेले ४ बाक्स प्रत्येकी ५,०००/–रू. असा एकुण कि. २०,०००/–रू., ३) ईलेक्ट्रीक कॉपर केबल ९,०००/–रू. असा एकुण कि. ३३,२००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री कांक्रेटवार मो.नं. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**